MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No. 62759 Vidyawarta® February 2018 Special Issue 

# INDEX


| | | |
|---|---|---|
| 1. | संत चोखामेळा यांचे अभंग<br>प्रा.विजयकुमार रामदास घोडके, डॉ.राजेंद्र ठाकरे | 12 |
| 2. | 'संत तुकारामांच्या अभंगातील पर्यावरण'<br>प्रा.डॉ.सुनील निगड | 18 |
| 3. | मराठी संत साहित्यातील विविध विचार<br>प्रा. मोरे भास र निवृत्ती | 22 |
| 4. | कर्मयोगी संत गाडगेबाबा<br>सहा प्रा. दादा मच्छिंद्र समुद्र | 28 |
| 5. | "मराठी संत साहित्य परंपरा व स्वरुप"<br>प्रा. डॉ. बोड ो जी.पी. | 31 |
| 6. | मराठी जैन संत साहित्य<br>प्रा.डॉ. जगदीश आवटे, | 35 |
| 7. | संत साहित्य परंपरा व स्वरूप<br>डॉ. भास्कर निफाडे, | 38 |
| 8. | संत - चोखामेळा यांच्या अभंगातील आत्मनिवेदन<br>डॉ. योगिता मारुती रांधवणे | 41 |
| 9. | मराठी संत साहित्यातील ज्ञानेश्वरांचे योगदान<br>प्रा. डॉ राजेंद्र ठाकरे | 44 |
| 10. | "समाज सुधार' : संत तु राम"<br>डॉ.अनिल र्जे, ि ऱ्हे ज्ञानदेव ि सनदेव | 49 |
| 11. | मराठी संत साहित्यातील स्त्रीचित्रण<br>प्रा. जाधव विजय साहेबराव | 53 |
| 12. | समाज प्रबोधनकार : संत तुकाराम<br>प्रा. डॉ. जालिंदर कानडे | 56 |
| 13. | संत नामदेवांच्या अभं ातील नवविधा भक्तीचे स्वरुप<br>श्री ल म ा ाठावळे | 59 |
| 14. | मराठीसंत साहित्यातील ज्ञानेश्वरांचे योगदान<br>प्रा. गोंटे मच्छिद्र रामचॅद्र | 63 |
| 15. | मराठी संत साहित्य विविध विचार<br>प्रा. दत्तात्रय सदाशिव सावंत | 67 |
| 16. | मराठी संत साहित्यातील भक्ती स्वरूप<br>प्रा. कल्पना तबाजी रोकडे | 71 |
| 17. | संत तु ारामांच्या ाव्यातील समाजजीवन<br>श्री. नवनाथ ` रू रक्टे | 80 |
| 18. | मराठीसंत साहित्यातील ज्ञानेश्वरांचे योगदान<br>प्रा. गोंटे मच्छिद्र रामचॅद्र, डॉ.राजेंद्र ठाकरे | 83 |
| 19. | ।संत तुकारामांच्या अभंगातील बुवाबाजीचे चित्रण।।<br>प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर | 88 |

8

# संत - चोखामेळा यांच्या अंभगातील आत्मनिवेदन

**डॉ. योगिता मारुती रांधवणे**
महाराजा जिवाजीराव शिंदे महाविदयालय,
श्रीगोंदा. मोबा. नंबर. ८१४९४१४१२६.

तेराव्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संतश्रेष्ठींनी महाराष्ट्रात परमार्थिक क्रांती घडवून आणली. या संतामध्ये संत चोखामेळा आपल्या आगळयावेगळया व्यक्तिमत्वाने व अभंगवाणीने आजही आदर्श वाटतात त्यांचे प्रामाणिक आत्मनिवेदन त्यांच्या अभंगात येते. अभंग म्हणजे भक्तीच्या शाब्दीक अविष्कार होय. संत चोखोबांनी अनुभवातील अविष्कार शब्दांच्या रुपाने अभंगातून व्यक्त केला आहे. त्यांच्या अभंगामध्ये आत्मनिष्ठता दिसून येते.

श्री सकलसंतगाथेमध्ये चोखामेळा अभंगगाथेत स्वस्थिती या शिर्षकाने दिलेले ७६ अभंग आहेत त्यात त्याचे आत्मनिवेदन आले आहे.

संत चोखामेळा एक संतश्रेष्ठ म्हणून त्यांचे नाव सर्वश्रृत आहे. त्यांचे संपूर्ण कुटूंबाचे विठ्ठलमय झालेले होते. त्यांची पत्नी सोयरा, बहिण निर्मळा, मेहुणा बंका व मुलगा कर्ममेळा हे सर्व प्रपंचाबरोबरच विठ्ठलभक्ती नामस्मरण करीत होते. परंतु जातीचा चटका मात्र या संताला आयुष्यभर सोसावा लागला. पंढरीच्या विठ्ठलाला आपले आराध्य दैवत मानून विठ्ठल त्याच्या ध्यानी मनी एकरुप झाला. या अव्दैत अवस्थेची रुपे त्यांनी आपल्या अभंगातून व्यक्त केली आहे. अतिशूद्राच्या कुळात जन्म घेणारा हा चोखामेळा संसारात सुखाचे दिवस अभावानेच उपभोगत होता. 'काय हे दु:ख किती हया यातना। सोडवी नारायणा यांतोनिया'[१] या चोखामेळाच्या अभंगावरुन त्याच्या दु:खी जीवनाची कल्पना येते.

शुध्द चोखामेळा। करी नामाचा सोहळा।
यातीहीन मी महार। पूर्वी निळाचा अवतार।
कृष्णनिंदा घडली होती। म्हणोनी महार जन्मप्राप्ती।।
चोखा म्हणे विटाळ। आम्हा पूर्वीचे हे फळ।।[२]

या अशा प्रथम पुरुषी उल्लेखाच्या निर्देशामुळेच आत्मनिवेदनाला विश्वसनियता आली आहे. चोखामेळा यांना विठ्ठलाप्रती अपार प्रेम होते पण जातीच्या उतरंडीत सर्वात खालचे स्थान होते. म्हणून विठ्ठलदर्शन त्यांना मंदीरात जावून घेता आले नाही. महार समाजात जन्माला येऊनही त्या समाजाबद्दल तिटकारा किंवा उच्च समाजाबद्दल व्देष त्यांच्या निवेदनात कुठेच नाही. याउलट जीवनात हरिभक्तीची ओढ निर्माण झाल्याने व आत्मप्रातीसाठी गुरुची भेट झाल्यने ते आनंदी आहेत.

धन्य धन्य नामदेव। माझा निरसला भेव।।
विठ्ठल मंत्र त्रिअक्षरी। खूण सांगितली निर्धारी।।
ठेवोनी माथा हात। दिले माझें मज हित।।[३]

संत नामदेवांनी चोखामेळाच्या मस्तकावर हात ठेवला. व त्यांना नाममंत्र दिला. नामदेवाची कीर्तने चोखोबांच्या कानी पडत होती. परंतु हीन यातित्वामुळे त्यांना त्या कीर्तनात भागीदार होता येत नव्हते. सतत बोचणारे हे दु:ख नामदेवांना कळल्यानंतर भक्तिमार्गाचा पहिला टप्पा म्हणून त्रिअक्षरी मंत्र 'विठ्ठल' हा त्यांनी दिला असे चोखोबा म्हणतात. नामदेवांनी 'माझे हित' मला दिले मला परमार्थाची निश्चित खूण सांगितली आणि

भवसागराच्या पैलथडी जाण्याचे 'तारु' माझ्या गुरुंनी मला दाखविले अशा शब्दांत चोखोबांनी नामदेवाप्रती कृतज्ञता व्यक्त केलेली आहे.

चोखामेळा आत्मनिवेदनातून उपदेशही करतात. त्यांचे आत्मनिवेदन म्हणजे त्यांच्या जिव्हारी लागलेली खंत आहे. की जी आपल्याही काळजाला भिडते. चोखोबाच्या अभंगातील विठ्ठल सजीव आहे.

बहुत हिंडलो देश देशांतरे।
परी मन नाही स्थिर झाले कोठे।।
चोखा म्हणे पाहतां पंढरीभुवैकुंठ।
मनाचे हे कष्ट दूर गेले।।[४]

विठ्ठलाच्या सहवासाने चोखोबाचे जीवन फुलत गेले त्यांच्या या भक्तीला अतुट प्रेमाची समर्पणाची बैठक आहे. चोखोबाच्या मते भक्तीचे असे वैशिष्ट आहे की भक्ती एकदा का अंत:करणात रसरसुन भरली तर भेदभावनेचा निरास होता व मनुष्य अभेदाकडे जायला लागतो. त्याला फक्त भक्ती दिसते. व तो परमेश्वरात विलीन होतो. या विचारामुळेच चोखोबाला भक्तीच्या उदात्त पातळीवर जाता आले. वारकरी व दिंडी याबद्दल त्यांना लहानपणापासून आकर्षण होत हे त्यांच्या आत्मनिवेदनातुनच येते.

जन्मगत येणारी अवहेलना मात्र त्याच्या निवेदनातून दिसते. चोखोबांच संपूर्ण बालपण लोकांनी महाराच पोर म्हणून केलेली, विटंबना व अवहेलनेत गेल. संपूर्ण आयुष्य लोकांच्या पुढे भाकरीसाठी हात पसरण्यात गेले. परंतु त्यांनी सगळे अपमान सहन केले कारण त्यांना विठ्ठलच एक आधार होता. व त्यामुळे दु:ख हलके वाटत होते.

सुलभ सोपारे विटोबाचे नाम।
आणिक नाही वर्ण दुजे काही।।[५]

चोखामेळा शुध्द भक्तीला खरी भक्ती मानतात. व स्वत:ला शुध्दतेचे साधन मानतात संताने शुध्दच असावे आपल्या आचरणाने आपल्या भक्तीने तरच खरी भक्ती करता येते देवाचे नामस्मरण करण्यात चित्त शुध्द हवे अशी त्यांची विचारसरणी आहे. त्या काळात महार मंदिरात गेला तरी देहांताची शिक्षा होती. वर्ण श्रेष्ठता पाहून न्यायदान केले जायचे. या वातावरणात एक विठ्ठलच समानतेचे एकरुपतेचे प्रेमाचे माहेर चोखोबाला वाहत होते. परंतु समाजात विटाळाला महत्व होते.

चोखा म्हणे विटाळ।
आम्हा पूर्वीचे हे फळ।।

पूर्वजन्मीच्या कर्माचे फळ याजन्मी भोगावे लागतात. सृष्टीचा जन्म विटाळातून झाला आहे. माणूसही विटाळातून जन्माला येतो, तेव्हा आपल्या जन्मही घाणीतून झाला व हे पूर्वीचे कर्म आहे असे तत्कालीन समाजाचे विचार होते तेच चोखोबांच्या अभंगातून व्यक्त होतांना दिसतात.

चोखामेळा आपल्या मनातील सर्व भाव विठ्ठलाला सांगतात. पांडूरंगाच्या पायावर लोटांगण घालण्याची कितीही इच्छा असली तरी त्यांना देवळात जाण्याची परवानगी नव्हती मान अपमान याच्या पलीकडे ते गेलेले होते. फक्त विठ्ठलच आपला आहे. व आपल्याला संकटात मदत करणारा आहे. विठ्ठलाच्या गळयातील हार चोखोबाच्या गळयात कसा? या कारणावरुन चोखोबाला देव बाटविला व चोर ठरवून अमानुष मारहाण केली जाते तेव्हा व विठ्ठलाला आर्त साद घालतात.

धाव घाली विठू आता चालु नको मंद।
मज मारिती बडवे काहीतरी अपराध।।
विठोबाचा हार तुझ्या कंठी कैसा आला।
शिव्या देऊनी मारा म्हणती देव का ब्राहला।।[६]

आपल्या सारख्या सामान्य माणसांना प्रश्न पडतो की, चोखामेळा संदर्भात विठ्ठल देखिला पाहिला असे शब्द अभंगात येतात. त्यांच्या आत्मनिवेदनात विठ्ठलाने रलहार दिला अलिंगन दिले हे संदर्भ आहेत. वास्तविक त्यांना हा अधिकार नव्हता ते जातीने महार होते पण येथे चोखामेळयाची समर्थ कल्पना व प्रतिभाच याप्रकारची स्वप्न फुलवू शकते. विलक्षण प्रतिभा कल्पनाच असे अभंग तयार करु शकतात.

माझा देह संसारात खूप शिणला आहे मला शांत कर, तूच मला यातून मुक्त कर असे ते विठ्ठलाला विनवणी करतात.

चोखा म्हणे मज घ्यावे पदरात
ठेवा माझे चित्त तुमचे पायी।

आणि काही दिवसानंतर गावकूस घालण्यासाठी गेलेला चोखोबा भिंतीखाली गाडले जातात त्यात त्यांचा अंत होतो व त्यांची समाधी नामदेवांनी महाव्दारी बांधली आहे.

**समारोप :-**

संत चोखामेळा त्यांच्या आत्मपर अभंगातून त्यांच्या जीवनचरित्राचा काही भाग सांगतात. त्यांच्या आत्मिक विकासाचा आलेख ठसठसीत पणे येथे उमटला आहे. लौकिक जीवनात वाहयाला आलेल्या दुर्दशेविरुध्द ते कोठेही तक्रार करतांना दिसत नाही. त्यामुळे आपण विठ्ठलाच्या निकट सहवास सुखापासून वंचित झालो याबद्दलचे केवळ क्लेशच मर्मस्पर्शी शब्दात व्यक्त करतात. अगदी प्रामाणिकपणे.

**संदर्भ :-**

१. सकल संतगाथा (प्रकाशन : त्र्यंबक हरी आवटे, पुणे, १९२४, चोखामेळा, पुरवणी अ.५०.
२. श्री संत चोखामेळा चरित्र आणि अभंग, संपा-स.भा. कदम शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर, १९९८, पृ-१३०
३. सकल संतगाथा, चोखामेळा, पुरवणी अ-८७.
४. संपा स.भा. कदम उपरोक्त पृ.क्र. १२९.
५. संपा स.भा. कदम उपरोक्त पृ.क्र. १५१.
६. संपा स.भा. कदम उपरोकत पृ.क्र. १३२.